मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ४, एप्रिल २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मा. कृषिमंत्री यांच्या शुभहस्ते कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्रथम शैक्षणिक सत्राचे ऑनलाइन उद्घाटन संपन्न









**दि. ५ एप्रिल, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत काष्टी येथील पाच कृषि महाविद्यालयांपैकी पहिल्या महाविद्यालयाच्या प्रथम शैक्षणिक सत्राचे उद्घाटन करतांना मनस्वी आनंद होत असून हे कृषि विज्ञान संकुल मालेगावच्या विकासात नावलौकीक मिळवेल, असा विश्वास राज्याचे कृषि व माजी सैनिक कल्याण मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला.

कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील प्रथम शैक्षणिक सत्राचे उद्घाटन मंत्री श्री.भुसे यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्यासाठी अपर जिल्हाधिकारी धनंजय निकम, विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.अशोक फरांदे, कुलसचिव मोहन वाघ, प्रकल्प अधिकारी डॉ.विश्वनाथ शिंदे, तालुका कृषि अधिकारी बाळासाहेब व्यवहारे, कृषि निष्ठा पुरस्कार प्राप्त शेतकरी विनोद जाधव, रामभाऊ मिस्तरी, संजय दुसाने यांच्यासह कृषि महाविद्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलतांना मंत्री श्री. भुसे म्हणाले, महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत साकारण्यात येणारे कृषि विज्ञान संकुल हे राज्य पातळीवर प्रथम क्रमांचे असेल. कृषिचा मान, प्रतिष्ठा वाढविण्यासाठी कृषि व्यवसाय व्यवस्थापन हे पहिलेच शासकीय महाविद्यालयाची सुरूवात होत आहे. या महाविद्यालयाच्या प्रथम सत्राचा उद्घाटन सोहळा

मोठ्या स्वरूपात साजरा करण्याचे प्रस्तावित होते. परंतू कोरोनाच्या महामारीमुळे शासनाच्या निर्देशाचे पालन करत आज ऑनलाईन पध्दतीने छोटेखानी स्वरूपात हा कार्यक्रम संपन्न होत आहे. आज या प्रकल्पाच्या माध्यमातून छोटे रोपटे रोवण्यात आले असून भविष्यात विभागातच नाही तर संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांचे कृषि मार्गदर्शन केंद्र असेल अशी ग्वाही देखील श्री. भुसे यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात तसेच मान्यवरांचे स्वागत विद्यार्थीनींनी स्वागत गीताने केली. या प्रसंगी सर्व प्रथम राज्याचे कृषि मंत्री श्री. दादाजी भुसे यांनी प्रथम वर्षात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना पुष्पगुच्छ देवून गौरविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार डॉ. संजय पाटील आणि डॉ. दिनेश बिरारी यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात व्हर्चुअल क्लासरुमचे उद्‌घाटन








**दि. १६ एप्रिल, २०२१.** व्हर्चुअल क्लासरुम आणि ॲग्री–दिक्षा वेब एजुकेशन चॅनलमुळे कृषि शिक्षणाची गुणवत्ता वाढणार आहे. देशातील आणि परदेशातील कृषि शास्त्रज्ञ आणि प्राध्यापकांचे व्याख्याने देशभरातील कृषि पदवीधरांना एकाच प्लॅटफॉर्मवर बघता येणार आहे. हे व्हर्चुअल क्लासरुम म्हणजे कोरोनाच्या या आपत्तीचे ईष्ट आपत्तीमध्ये आपण रुपांतर

केले आहे असे प्रतिपादन केंद्रिय कृषि व किसान कल्याण, ग्रामीण विकास व पंचायती राज मंत्री ना. श्री. नरेंद्र सिंह तोमर यांनी केले.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि जागतिक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने भारतात एकुण १८ कृषि विद्यापीठे आणि भारतीय कृषि अनुसंधान अंतर्गत संस्थांना व्हर्चुअल क्लासरुम देण्यात आल्या आहे. या व्हर्चुअल क्लासरुमचे केंद्रिय कृषि व किसान कल्याण, ग्रामीण विकास व पंचायती राज मंत्री ना. श्री. नरेंद्र सिंह तोमर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रिय कृषि व किसान कल्याण राज्य मंत्री ना. श्री. पुरुषोत्तम रुपाला, भारत सरकारच्या कृषि संशोधन व शिक्षण विभागाचे सचिव व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्र, डेअरचे विशेष सचिव आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सचिव श्री. संजय कुमार सिंह, रा.ऊ.कृ.प.चे राष्ट्रीय निदेशक आणि भा.कृ.अ.प.चे उपमहासंचालक (शिक्षण) डॉ. आर.सी. अग्रवाल, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभात कुमार, भा.कृ.अ.प.चे निदेर्शक डॉ. राजेंद्र प्रसाद, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे ऑनलाईन उपस्थित होते.

ना. श्री. नरेंद्र सिंह तोमर पुढे म्हणाले भारत हा कृषि प्रधान देश असून कृषि क्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या कृषि क्षेत्राचा आधार शेतकरी आणि कृषि शास्त्रज्ञ आहे. कृषि पदवीधरांनी कृषि उद्योजक व्हावे. कृषिच्या ज्ञानाचा शेतकऱ्यांमध्ये प्रसार करावा आणि कृषिमधील नवनविन संकल्पना घेवून संशोधन करावे. यावेळी केंद्रिय कृषि व किसान कल्याण राज्य मंत्री ना. श्री. पुरुषोत्तम रुपाला म्हणाले या कोव्हीड–१९ परिस्थितीमध्येसुध्दा ऑनलाईन प्रणालीमुळे शिक्षण थांबलेले नाही. आजकालचे विद्यार्थी भाग्यशाली आहे कारण त्यांना अद्ययावत ऑनलाईन शिक्षण प्रणालीतुन शिक्षण मिळत आहे. या विद्यार्थ्यांनी व्हर्चुअल क्लासरुमचा जास्तीत जास्त फायदा करुन घ्यावा. महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्र यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. आर.सी. अग्रवाल यांनी व्हर्चुअल क्लासरुमसंबंधी माहिती दिली.

महाराष्ट्र राज्यात फक्त महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये हे व्हर्चुअल क्लासरुम देण्यात आलेले आहे. या व्हर्चुअल क्लासरुममध्ये जे व्याख्यान घेतले जाते ते एकाच वेळेस वेबकास्ट करुन भारतात सर्व ठिकाणी बघणे शक्य होते. या व्हर्चुअल क्लासरुममध्ये घेतेलेले लेक्चर ॲग्री–दिक्षा वेब इजुकेशन चॅनलवर केव्हांही बघणे शक्य होते. याप्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, निम्नस्तर कृषि शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. या ऑनलाईन कार्यक्रमाची व्यवस्था व्हर्चुअल क्लासरुमचे नोडल अधिकारी डॉ. एम.आर. पाटील यांनी केली. या ऑनलाईन कार्यक्रमासाठी देशभरातील विविध कृषि विद्यापीठाचे कुलगुरु, संचालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मानले.

## ''मागोवा'' कार्यक्रम उत्साहात संपन्न





**दि. १ एप्रिल, २०२१.** कृषि क्षेत्रात दिवसेंदिवस अनेक बदल होत आहेत. तसेच शेतकऱ्यांसमोर नविन आव्हाने उभी राहत आहेत. या पार्श्वभूमीवर कृषि क्षेत्रातील भविष्याचा वेध घेवून शास्त्रज्ञांनी कार्य करावे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुभाष पुरी यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठात मागोवा-२०२० या ऑनलाईन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य प्रा. नाथाजी चौगुले, सौ. सुनिता पाटील, डॉ. पंकजकुमार महाले, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. मोहन वाघ, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके ऑनलाईन उपस्थित होते.


यावेळी बोलतांना डॉ. सुभाष पुरी पुढे म्हणाले की मा. पंतप्रधानांच्या पाण्याचा प्रति थेंब जास्त उत्पादन तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे यासारख्या राष्ट्रीय कार्यक्रमाला सिध्दीस जाण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आजच्या काळात सेंद्रिय शेती तसेच तापमान वाढ सहन करणारे पिकांचे उन्नत वाण संशोधीत करण्याची गरज आहे. पॉलीहाऊसमधिल लागवडीसाठी लागणाऱ्या गुलाब फुलाचे उन्नत वाण संशोधित केल्यास शेतकऱ्यांना यासाठी परदेशातून आयात करण्यासाठी लागणारा पैसा आणि वेळ आपण वाचवू शकु. डॉ. पुरी पुढे म्हणाले की विद्यापीठ कार्यक्षेत्रात येणाऱ्या सलग्न महाविद्यालयांची घडी बसविणे गरजेचे आहे. अशा सलग्न महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे विद्यापीठ स्तरावर त्यासाठी लागणारा वेगळा परिक्षा कक्ष मनुष्यबळासह निर्माण करणे काळाची गरज आहे.


अध्यक्षीय मार्गदर्शनात कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले की विद्यापीठाच्या गत वर्षात झालेल्या ठळक घडामोडींचा आढावा मागोवा कार्यक्रमात घेण्यात येतो. परंतु यापुढे वेध भविष्याचा अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करुन शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाचे पुढील पाच वर्षाचा आराखडा तयार करण्याचा प्रयत्न राहिल. संशोधनाबद्दल ते म्हणाले की आगामी काळात विविध पिकांच्या वाणात पोषक अन्नद्रव्यांचा समावेश कसा करता येईल याकडे लक्ष दिले जाईल. सरकारी खाजगी भागीदारीद्वारे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या कृषि निविष्ठांचे उत्पादन वाढवून ते

अधिकाधिक शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. कुलगुरु डॉ. पाटील पुढे म्हणाले की फुले ब्रँड हा शेतकऱ्यांमध्ये अधिक लोकप्रिय होत आहे. कृषि पदविधरांना प्रशिक्षण देवून त्यांना कृषि उद्योजकतेसाठी उद्युक्त करण्यात येईल. उपलब्ध मनुष्यबळाचा पुर्ण क्षमतेने वापर करुन हे कृषि विद्यापीठ यशस्वी मार्गक्रमन करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या ऑनलाईन कार्यक्रमात विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन 'कृषिदर्शनी २०२१' चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले तसेच गतवर्षाचा संशोधनाचा व विस्तार शिक्षणाचा आढावा त्यांनी सादर केला. अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे यांनी शिक्षणाचा आढावा, कुलसचिव श्री. मोहन वाघ यांनी प्रशासनाचा आढावा, वित्त विभागाचा आढावा नियंत्रक श्री. विजय कोते आणि बांधकाम विभागाचा अहवाल विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले. प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे यांनी आभार मानले. या ऑनलाईन कार्यक्रमाला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, सहयोगी संशोधन संचालक, पीक विशेषज्ञ, संशोधन केंद्रांचे व योजनांचे प्रमुख, विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि विज्ञान केंद्राचे अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## शेतीसाठी ड्रोन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




**दि. ६ एप्रिल, २०२१.** विविध कंपन्या व स्टार्ट–अप यांच्या सहकार्याने संशोधन करुन नविन तंत्रज्ञान विकसित करणे व त्याचबरोबर डेटा ॲनालिटिक्स व स्टोरेज सुविधा गरजेचे असल्याचे प्रतिपादन भारत सरकार नागरी उड्डायन मंत्रालयाचे सहसचिव श्री. अंबर दुबे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापिठातील कास्ट–कासम या प्रकल्पातंर्गत ड्रोनची मुलभुत तत्वे या विषयावर आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन २१ दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन भारत सरकार नागरी उड्डायन मंत्रालयाचे सहसचिव श्री. अंबर दुबे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.

दिलीप पवार, कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार, कार्यक्रम संचालक डॉ. सचिन नलावडे उपस्थित होते.

यावेळी बोलतांना श्री. दुबे पुढे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संशोधन व विकास आणि प्रशिक्षण सुविधा स्थापित करण्यासाठी डिसीजीए कडून सर्व सहकार्य व मान्यता देण्यासाठी तयारी दर्शविली. भारतामध्ये ड्रोन तंत्रज्ञानाच्या संचनालयासाठी परिसंस्था विकसित करण्यासाठी विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी शेतीमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाचे महत्व विषद केले. विना अडकाठी ड्रोन चालविण्यासाठी ग्रिन झोन तयार करण्यासाठी डिजीसीएने राबविलेल्या विविध उपायोजनांची माहिती दिली. कृषि क्षेत्रातील ड्रोनच्या संशोधनासाठी एक उत्कृष्ट संशोधन व विकास प्रयोगशाळा विकसीत करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे त्यांनी कौतुक केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले ड्रोनच्या संशोधनासाठी अत्याधुनिक संशोधन व विकास प्रयोगशाळा अधिक कार्यक्षम करणे व ड्रोन चालकांसाठी प्रशिक्षण संस्था चालू करण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न करण्यात येतील. तसेच इन्कुबेशन सेंटरच्या मदतीने ड्रोन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी नवीन स्टार्ट–अपला मदत करुन त्यांना सक्षम करण्याची तयारी दर्शविली. या राष्ट्रीय ऑनलाईन प्रशिक्षणात १०२ प्रशिक्षणार्थिंनी सहभाग नोंदवला. यामध्ये देशातील विद्यार्थी, शास्त्रज्ञ व कृषि विज्ञान केंद्रांचे अधिकारी सहभागी झाले होते. डॉ. दिलीप पवार यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व ओळख करुन दिली. कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रकल्पाची माहिती दिली तर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा आढावा कार्यक्रम संचालक डॉ. सचिन नलावडे यांनी सादर केला. समन्वयक म्हणुन इंजि. योगेश दिघे, डॉ. गिरिशकुमार भणगे आणि इंजि. श्रद्धा वराळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ओरियंटेशन कार्यक्रमाचे आयोजन



**दि. २० एप्रिल, २०२१.** कृषि क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. याला अजुन मजबुती देण्यासाठी कृषि पदवी आणि पदवीधर विद्यार्थ्यांनी कृषि उद्योजक होऊन कृषि क्षेत्रात रोजगाराची निर्मिती करावी असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा ओरियंटेशन

कार्यक्रम ऑनलाईन नुकताच पार पडला. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे बोलत होते. याप्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, निम्नस्तर कृषि शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, सर्व विभाग प्रमुख ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोक फरांदे पुढे म्हणाले की राष्ट्रीय पातळीच्या शिक्षणाची स्पर्धा करण्यासाठी पुढील वर्षापासुन पाचव्या अधिष्ठाता समितीनुसार संपुर्ण देशात पदव्युत्तर महाविद्यालयाचा एकच अभ्यासक्रम असणार आहे. या कोव्हीड–१९ परिस्थितीमध्ये डिजीटल माध्यमाद्वारे प्रभावी शिक्षण सुरु आहे. विद्यार्थ्यांनी नविन संकल्पनेवर संशोधन करावे. या डिजीटल युगामध्ये काटेकोर शेती पध्दतीवर अधिकचे संशोधन करुन आपले नैसर्गीक स्त्रोत संवर्धन करावे.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करातांना सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ म्हणाले कृषि विद्यापीठांमध्ये आणि कृषि महाविद्यालयांमध्ये संशोधनासाठी, शैक्षणिक उपक्रमांसाठी आणि विविध गुणदर्शनासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा आपल्या संशोधनासाठी आणि व्यक्तीमत्व विकासासाठी विद्यार्थ्यांनी पुरेपुर वापर करावा. विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर महाविद्यालयाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे व आपले करीयर घडवावे. आपल्याला दिलेल्या अवधित आपली पदव्युत्तर पदवी पुर्ण करावी.

याप्रसंगी डॉ. दिलीप देवकर यांनी पदव्युत्तर महाविद्यालयाचा शैक्षणिक उपक्रम आणि नियमांचे सादरीकरण केले. डॉ. महानंद माने यांनी वसतुगृहासंबंधीत माहितीचे सादरीकरण केले. विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. अतुल देशमुख यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाची  माहिती करुन दिली. यावेळी पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे, कोल्हापूर येथील शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना आपला परिचय करुन दिला. या प्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे आणि कोल्हापूर येथील पदव्युत्तर महाविद्यालयात प्रवेश घेतलेले विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. बी.बी. ढाकरे यांनी तर आभार विद्यार्थी कल्याण अधिकारी (प.म.) डॉ. विजय पाटील यांनी मानले.

## मधुमक्षिका पालना वरील ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ६ एप्रिल, २०२१.** मधुकक्षिका पालनातुन शुध्द मधाचे उत्पादन व त्यासाठीची सक्षम विक्री व्यवस्थेची उभारणी केल्यास या व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होवून मधुमक्षिकापालन हे एक अर्थजनाचे साधन होवु शकते असे

प्रतिपादन पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. कृषि किटकशास्त्र विभाग व पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक, युवती आणि महिला यांचेकरीता मधुमक्षिकापालन शेतीपूरक उद्योग या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषि किटकशासत्र विभाग प्रमुख डॉ. चिदानंद पाटील उपस्थित होते. डॉ. चिदानंद पाटील म्हणाले भूमिहीन शेतमजूर तसेच अल्पभुधारक शेतकरी यांचेकरीता या व्यवसायात मोठी संधी आहे. किटकनाशकांच्या अतिवापरामुळे दिवसेंदिवस मध्यमाशांच्या कमी होणाऱ्या संख्येबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. नाशिक येथील गोवार्धन सुप्रकृति मधुशाळा संस्थापक संचालक डॉ. तुकाराम निकम यांनी मधमाशी वाढीसाठी लागणारे विविध कौशल्य तसेंच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांविषयी प्रशिक्षणार्थींना माहिती दिली. बंगलुर येथील हनीबीड फार्म संचालक डॉ. बी.व्ही. अपूर्वा, डॉ. उत्तम सहाणे, डॉ. बी.वाय. पाटील, डॉ. एस.ए. लांडगे, डॉ. आर.व्ही. कडू यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. पी.आर. पाळंदे तर डॉ. वाय.एस. सैंदाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### हळगाव कृषि महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा ओरिएन्टेशन कार्यक्रम संपन्न

**दि. ५ एप्रिल, २०२१.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा ओरिएन्टेशन कार्यक्रम ऑनलाईन प्रणालीद्वारे घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, डॉ. एम.आर. पाटील, डॉ. सखेचंद अनारसे, विद्यार्थी कल्याण अधिकारी व महाविद्यालयाचा सर्व स्टाफ ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. मिलिंद अहिरे म्हणाले कोव्हीड–१९ परिस्थितीमध्ये आपले सर्व वर्ग ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ हा अभ्यासात घालवावा. या कोव्हीड १९ परिस्थितीत सरकारने दिलेल्या नियमांचे पालन करावे. याप्रसंगी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे प्रथत वर्षात प्रवेश मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. डॉ. एम.आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांना कृषि पदवी अभ्यासक्रमातील सर्व माहिती पावर पॉईंटद्वारे दिली. मुलांचे वसतीगृहबाबतची माहिती डॉ. अनारसे यांनी तर मुलींच्या वसतीगृहाची माहिती डॉ. धनश्री सरनोबत यांनी दिली. सर्व विद्यार्थी व महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ऑनलाईन प्रणालीद्वारे ओळख करुन देण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे कृषि सहाय्यक सौ. अंजली देशपांडे, सौ. वैशाली पोंदे, सौ. सासवडे व श्री. अमृत सोनवणे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर आभार सौ. अंजली देशपांडे यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२१

## मे महिन्यातील कृषि सल्ला

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग पीक काढणीयोग्य तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात, शेंगाचे टरफल टणक बनते व टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागल्यास पिकाची काढणीकरुन भुईमूगाच्या शेंगा चांगल्या वाळवून साठवणूक करावी.

### बागायती कापूस

- मे महिन्याच्या मध्यापर्यंत जमीन चांगली तापल्यानंतर २ ते ३ वखराच्या आडव्या व उभ्या पाळ्या देवून ढेकळे फोडून शेत सपाट करून घ्यावे.
- शेवटच्या वखर पाळी अगोदर हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरावे.
- बीटी कपाशीसाठी पेरणीच्यावेळी हेक्टरी २५ किलो नत्र, ६५ किलो स्फुरद, व ६५ किलो पालाश द्यावे.
- बिगर बीटी कपाशीसाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे.
- बीटी कपाशीची लागवड २० मे नंतर ९० सें. मी. x ९० सें. मी., किंवा १२० सें. मी. x ६० सें. मी. सऱ्या पाडून करावी.
- बागायती बिगर बीटी कपाशीची लागवड सोलापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यासाठी मार्चचा पहिला पंधरवाडा, अहमदनगर जिल्ह्यासाठी एप्रिलचा पहिला पंधरवाडा तर खानदेश, विदर्भ मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी मे चा दुसरा पंधरवाडा या दरम्यान करावी.
- पेरणीपूर्वी एका पिशवीतील बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरीलम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जिवाणू तसेच ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रिया करून सऱ्या ओलावून पेरणी करावी.
- बीटी कपाशीभोवती ५ टक्के बिगर बीटी कपाशीची (रेफ्युजिया) लागवड करावी.
- पेरणीनंतर उगवणीपूर्वी पेंन्डीमिथॅलिन ३० ई. सी. क्रियाशील घटक ५० ते ८० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी.

### ऊस

- सिंचनाची सोय असल्यास सुरु उसाची मोठी बांधणी करुन घ्यावी.
- सुरु उसासाठी मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रती हेक्टरी द्यावे.
- उसाला युरियाची मात्रा देताना निंबोळी पेंडींची भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे. किंवा निमकोटेड युरिया वापरावा.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून उन्हाळयात पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी.
- खोडवा उसाला (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने रासायनिक खतांचा दुसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया) ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी द्यावा.

- काणी व गवताळ वाढीची बेटे समूळ काढून नष्ट करावीत.
- उसासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांपर्यंतच्या सुरू व खोडवा उसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति आठवडा प्रति एकरी ६.५ किलो युरीया, ४.५ किलो मोनोअमोनिअम फॉस्फेट व २ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करावा.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतुन पाणी द्यावे.
- पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. जेणे करून पाण्याचे बाष्पीभवन कमी होवून जमिनीत ओलावा टिकवून राहण्यास मदत होईल.

## कडधान्य

मूग आणि उडिद

- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २ पाळ्या दयाव्यात, काडीकचरा वेचून घ्यावा.
- हेक्टरी ५ टन शेणखत

## तूर

- हेक्टरी ५ टन कंपोस्ट / शेणखत टाकावे.
- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २–३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.

## भात

- पूर्वमशागत : भात पिकाच्या योग्य वाढीसाठी शेताची योग्य प्रकारे पूर्वमशागत करणे अत्यंत महत्त्वाचे असते. पूर्वमशागतीमुळे जमिनीच्या विविध थरांची उलथापालथ होते आणि काही प्रमाणात तण, कीड व रोगांचेही नियंत्रण होते.
- सेंद्रीय खतांचा वापर : नांगरणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन शेणखत अथवा कंपोस्ट खत मातीमध्ये पूर्णपणे मिसळून द्यावे.

## भात वाण निवड

| नाव | वैशिष्ट्ये | उत्पादन (क्विं./हे.) | |
|---|---|---|---|
| | | धान्य | पेंढा |
| इंद्रायणी | लांब, पातळ, सुवासिक दाण्यांची निमगरवी जात. करपा व पर्णकरपा रोगास मध्यम प्रतिकारक | ४०–४५ | ४४–४८ |
| फुले समृद्धी | मध्यम प्रतिकारक लांब, पातळ दाण्यांची निमगरवी जात. करपा, कडा करपा व खोड किडीस | ४५–५० | ४९–५३ |
| भोगावती | लांब, पातळ, सुवासिक दाण्यांची निमगरवी जात. करपा व पर्णकरपा रोगास मध्यम प्रतिकारक | ४०–४५ | ५०–५५ |
| फुले राधा | मध्यम–बारीक, हळवा, करपा व कडा करपा रोगास मध्यम प्रतिकारक. | ३५–४० | ४२–४५ |

### नाचणी

- जमिनीचा प्रकार : उुळ
- जमिनीची खोली : २५–३० सें.मी.
- जमिनीचा पोत : वाळूमय ते पोयटा मिश्रण
- सामू : ६.० ते ७.३, विद्युत वाहकता : ०.१० – ०.४० डेसिसायमन/ मिटर
- शेतीची नांगरट करणे, कुळवणी करणे, शेतातील धसकटे वेचणे.
- जमिनीची मशागत : पुर्वमशागत : एक नांगरणी उतारास आडवी आणि दोन कुळवाच्या पाळ्या देणे. पेरणीपूर्वी मशागत करताना सेंद्रिय खताची मात्रा ५ टन/हेक्टरी मिसळावे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा – जमिनीची खोल नांगरट करावी.

### बाजरी

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत शेतात मिसळावेत.

### सोयाबीन

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत मिसळावे.

### फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब –** पाणी व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष द्यावे. जैवीक आच्छादन करावे.शक्यतो फुट काढणी करू नये. फळांना पेपरबॅग लावून संरक्षण करावे खोड किडीचे नियंत्रण करावे.
- **बोर –** १५ मे दरम्यान छाटणी करावी.
- **आवळा –** संरक्षित पाणी द्यावे.
- **अंजीर –** संरक्षित पाणी द्यावे.
- **जांभूळ –** संरक्षित पाणी द्यावे. खोडांची साल पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी गेरू व कॉपर ऑक्झीक्लोराईड + क्लोरोपायरीफॉस पेस्ट लावावी.
- **कागदी लिंबू –** उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी.
  पिठ्या ढेकूण : क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे.
  कोळी : डायकोफॉल २०–२५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे. झाडांच्या खोडावरील व फांद्यांवरील डिंक खरडून टाकावे. खोडावर जमिनीपासून २.५ फूट अंतरापर्यंत बोर्डोपेस्ट लावावी.

**भाजीपाला व्यवस्थापन**

- भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाला काढणीचे काम वेळेवर करावे.
- उन्हाळी, मिरची व वांगी पीक फुलोरा अवस्थेत उष्ण व जास्त तापमाणामुळे फुलगळ होण्याची शक्यता असते.
- उन्हाळी मिरची व वांगी पिकामधील फुलगळीचे प्रमाण कमी करून फळधारणा वाढविण्यासाठी संजीवकाची व सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी तसेच पिकाचे उष्ण तापमानापासून संरक्षणासाठी सभोवताल व प्रत्येक चार ओळीनंतर मका पिकाची लागवड करावी.
- टोमॅटो पिकाचे उन्हापासून संरक्षण करावे.
- किड व रोगाचा प्रार्दुभाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी योग्य उपाय करावेत.

**आले**

- आले लागवड १५ एप्रिल पासुन ते जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.
- लागवडीसाठी वरदा, रिजाथा, माहिम, महिमा यासुधारीत जातींची निवड करावी.
- कंद ४ ते ५ सें.मी. खोल लावावेत. कंद पुर्ण झाकले जातील याची दक्षता घ्यावी. आल्याला मध्यम प्रकारची सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते.
- जमिनीच्या उताराप्रमाणे लागणीची पध्दत निश्चित करुन जमिनीवर उताराच्या दिशेने बेड उठवून घ्यावेत. बेड एकसारखे सपाट होतील याची काळजी घ्यावी.
- बेड तयार करताना ट्रॅक्टरच्या फनपाळ्याचे सरळ बेड तयार करावे. लागणीचे वेळी आढीत ठेवलेले बियाणे बाहेर काढून त्याचे एकसारखे तुकडे करुन (मोड) घ्यावेत.

**पशुसंवर्धन**

- मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात पशुवैद्यकाच्या सल्लयाने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फ–या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचन घ्याव्यात.
- उष्माघातामध्ये सर्व प्रथम जनावराला थंड ठिकाणी बांधावे. त्यानंतर थंड पाण्यात ओला केलेला तळवटाचा, पोत्याचा तुकडा जनावराच्या दोन्ही शिंगाच्या मध्ये बांधून तो सतत ओला राहिल याची दक्षता घ्यावी हलके पाचक गुळमिश्रीत खाद्य द्यावे. भरपुर थंड पाणी पिण्यास द्यावे तत्काळ पशुवैद्यकांना बोलावून त्यांचे सल्याणे जनावरांवर आवश्यक औषधोपचार करावा.
- गोठयातील हवा खेळती राहिल याची दक्षता घ्यावी. तसेच गोठयात पंखे किंवा पाण्याचे फवारे उपलब्ध ठेवावे. मचुळ पाण्याचे व्यवस्थापन करावे.

**अवजारे**

**ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित ऑफसेट फळबागा व्यवस्थापन यंत्र**

- फळबागेतील जारवा तोडणे तसेच वरंबा फोडण्याकरिता उपयुक्त.
- ३५ अश्वशक्ती आणि त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने सहज चालते.
- ट्रॅक्टर पी.टी.ओ. यांत्रिक शक्ती तसेच हायड्रोलिक शक्तीचा वापर.
- फळबागेतील झाडांना कोणतीही इजा न होता एकाच वेळी फळबागेतील जारवा तोडणे तसेच वरंबा फोडणे हि दोन्ही कामे सहज करता येतात.
- हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित सेन्सर्स वापरले आहे.
- एका तासामध्ये ०.१३ हेक्टर क्षेत्र व्यवस्थापन करते.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ७२%
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ४८ % निवळ बचत.
- या यंत्राच्या वापरामुळे मजुरांची, श्रमाची तसेच वेळेची बचत.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार व संवाद विभाग
**डिझाईनर** : **श्री. राजेंद्र जांभळे**
**श्री. सिध्दार्थ साळवे**
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३९२/२०२१